# NATIONAL TALENT SEARCH EXAMINATION, 2015-16

## राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा, २०१५-१६

| CENTRE CODE केंद्र संकेतांक | 3 | 9 | | | | |
|---|---|---|---|---|---|---|

| SEAT NO. आसन क्रमांक | 2 | 3 | 9 | 1 | 6 | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

## STATE LEVEL EXAMINATION — QUESTION BOOKLET

## राज्यस्तरीय परीक्षा—प्रश्नपुस्तिका

# LANGUAGE TESTING

## भाषा कौशल्य

**CLASS X / इयत्ता १०वी**

**MEDIUM :- MARATHI (मराठी)**

**TOTAL PAGE 1–20**

**एकूण पाने 1–20**

**DATE : 8 NOVEMBER 2015, DAY : SUNDAY**

दिनांक : ८ नोव्हेंबर २०१५, वार : रविवार

[Time : 11.45 A.M. to 12.30 P.M.]

[वेळ : ११.४५ ते १२.३०]

Maximum Marks : 50

एकूण गुण : ५०

Time : 45 Minutes

वेळ : ४५ मिनिटे

Total Pages : 20

एकूण पाने : २०

SEAL

## परीक्षार्थींसाठी सूचना

प्रश्नांची उत्तरे देण्यापूर्वी पुढील सूचना काळजीपूर्वक वाचा. तुमची उत्तरे संयुक्त उत्तरपत्रिकेवर लिहावयाची आहेत :

(1) कृपया तुमचा केंद्र संकेतांक आणि आसन क्रमांक आकड्यामध्ये सुस्पष्ट लिहा. (एका चौकटीत एकच अंक याप्रमाणे) स्वत:चा आसन क्रमांक लिहिण्यापूर्वी तो बरोबर असल्याची खात्री करून घ्या. कोणताही रकाना रिक्त राहणार नाही याची दक्षता घ्या. प्रश्नपुस्तिका व उत्तरपत्रिका या वरील चौकटीत आसन क्रमांक व केंद्र संकेतांक यातील प्रत्येक अंक आणि शून्यसुद्धा योग्य जागी लिहा.

उदाहरणार्थ :

| CENTRE CODE केंद्र संकेतांक | 3 | 9 | | | | |
|---|---|---|---|---|---|---|

| SEAT NO. आसन क्रमांक | 2 | 3 | 9 | 1 | 6 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

(2) प्रत्येक प्रश्नाला **एक** गुण आहे.

(3) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत म्हणून उत्तरे लिहिण्यापूर्वी संपूर्ण प्रश्नपत्रिका वाचत बसू नका.

(4) पहिल्या प्रश्नापासून सुरुवात करा आणि एकामागून एक प्रश्न सोडवीत शेवटपर्यंत प्रश्न सोडवा.

(5) एखादया प्रश्नाचे उत्तर येत नसेल तर त्यावर जास्त वेळ घालवू नका. पुढचे प्रश्न सोडविण्यास घ्या. सर्व प्रश्न सोडवून झाल्यावर उरलेल्या वेळात राहून गेलेल्या प्रश्नांवर तुम्हाला पुन्हा विचार करता येईल.

(6) प्रश्न सोडविण्यासाठी तुम्हाला मिळणारा वेळ विचारात घेऊन त्याचा जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे उपयोग करा. कच्चे काम प्रत्येक पृष्ठावर दिलेल्या चौकटीतच करावयाचे आहे.

(7) लक्षात ठेवा तुम्हाला उत्तरे नोंदविण्यासाठी **"भाषा कौशल्य" (Language Testing)** चीच उत्तरपत्रिका मिळाली आहे याची खात्री करा.

(8) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरासाठी प्रश्नपुस्तिकेमध्ये पर्याय दिले आहेत. त्यापैकी तुम्हाला योग्य वाटेल त्या पर्यायाचा क्रमांक पहा व त्या क्रमांकाच्या वर्तुळात काळे करून उत्तर द्या. मात्र हे काम तुमच्या उत्तरपत्रिकेवर योग्य प्रश्नापुढे करावयाचे आहे **प्रश्नपुस्तिकेवर** नाही.

(9) कृपया या पुस्तिकेत केंद्र संकेतांक आणि आसन क्रमांक व कच्चे काम याखेरीज अन्य काहीही लिहू नका.

(10) आता प्रश्नांची उत्तरे देण्यास सुरुवात करा.

## भाषा कौशल्य—मराठी

**प्रश्न 1-5 : खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांच्या उत्तरांचे पर्याय दिलेले आहेत त्यातून अचूक पर्याय निवडा.**

'शारीरिक श्रमांना' प्रतिष्ठा मिळावी म्हणून महात्मा गांधीजींनी 'चरखा' हे त्याचे प्रतीक मानले होते. श्रमामुळे श्रमप्रतिष्ठा स्थापन होऊन आर्थिक विषमता संपेल अशी त्यांची भावना होती. तसेच त्यांचे 'सामाजिक विषमता' संपविणारे क्रांतीचे दुसरे प्रतीक होते 'झाडू'. खादी व स्वदेशी हे जीवनव्रत होते. कागद जोडण्यासाठी कधी टाचणी वापरली नाही, कारण तीही परदेशीच असे, त्याऐवजी आम्ही बाभळीचे काटे वापरीत होतो. संपूर्ण जीवन कमीतकमी गरजांवर आधारित असावे, अशी शिकवण मिळाल्यामुळे आम्हाला कधीही 'चंगळवादा'चा स्पर्श झाला नाही.

**— चंद्रशेखर धर्माधिकारी**

1. शारीरिक श्रमांना प्रतिष्ठा मिळावी म्हणून महात्मा गांधीजींनी कोणते प्रतीक मानले होते ?

(1) झाडू (2) खराटा

(3) चरखा (4) बादली

2. श्रमप्रतिष्ठा कशामुळे स्थापन होईल अशी महात्मा गांधीजींची भावना होती ?

(1) कामामुळे (2) श्रमामुळे

(3) घामामुळे (4) दामामुळे

3. लेखक कागद जोडण्यासाठी काय वापरत होते ?

(1) बाभळीचे काटे (2) टाचणी

(3) दोरा (4) डींक

4. कोणत्या वादाचा स्पर्श लेखकांना झाला **नाही** ?

(1) सीमावाद (2) भोंगळवाद

(3) आतंकवाद (4) चंगळवाद

5. वरील उताऱ्यास कोणते शीर्षक अधिक समर्पक वाटते ?

(1) क्रांतीनिष्ठा (2) श्रमप्रतिष्ठा

(3) देशनिष्ठा (4) शरीरनिष्ठा

**प्रश्न 6-10 : खालील कविता वाचून त्याखालील प्रश्नांच्या उत्तरांचे पर्याय दिलेले आहेत त्यातून अचूक पर्याय निवडा.**

नसे राऊळी वा नसे मंदिरी
	जिथे राबती हात तेथे हरी
जिथे भूमिचा पूत्र गाळील घाम
	तिथे अन्न होऊन ठाकेल राम
दिसे सावळे रूप त्याचे शिवारी
	नको मंत्र त्याला मुनिब्राम्हणांचे
तया आवडे गीत श्वासा-घनांचे
	वसे तो सदा स्वेदगंगेकिनारी
शिळा फोडती संघ पाथरवटांचे
	कुणी कापसा रूप देती पटांचे
	तयांच्या घरीं नांदतो तो मुरारी
जिथे काम तेथे उभा स्याम आहे
	नव्हे धर्म रे धर्म ते रूप पाहे
	असे विश्वकर्मा श्रमांचा पुजारी

**— ग. दि. माडगूळकर**

**6.** कवींच्या मते हरी कोठे आहे ?

(1) राऊळात
(2) मंदिरात
(3) देव्हाऱ्यात
(4) राबणाऱ्या हातात

7. सावळे रूप कोठे दिसते ?

(1) शिवारी
(2) डोंगरकपारी
(3) गिरीशिखरी
(4) अभाळी

8. हरीला कोणते गीत आवडते ?

(1) मुनिब्राम्हणांचे
(2) श्वासा-घनांचे
(3) भाविकांचे
(4) भक्तांचे

9. पाथरवटांचे संघ काय फोडतात ?

(1) वाळा
(2) गोळा
(3) शिळा
(4) माळा

10. विश्वकर्मा कोणाचा पुजारी आहे ?

(1) गीतांचा
(2) मंत्रांचा
(3) श्वासांचा
(4) श्रमांचा

11. पुढील वाक्यांचा क्रम बदललेला आहे. अर्थपूर्ण परिच्छेदासाठी योग्य क्रम लावा :

(क) कसलातरी शोध घेत होता.

(ख) केशव भरभरून बोलत होता.

(ग) माझं मन सारखं कुठेतरी भटकत होतं.

(घ) माझं मन मात्र लागत नव्हत.

(1) (घ)–(ग)–(क)–(ख) (2) (क)–(ख)–(ग)–(घ)

(3) (ख)–(घ)–(ग)–(क) (4) (क)–(ग)–(ख)–(घ)

12. 'झाड' हा शब्द शब्दसिद्धीच्या कोणत्या प्रकारातील आहे ?

(1) तद्‌भव (2) तत्सम

(3) परभाषिय (4) देशी

13. निबंधमालेचे लेखक कोण आहेत ?

(1) वि.वि. चिपळूणकर
(2) कृष्णाशास्त्री चिपळूणकर
(3) विष्णूशास्त्री चिपळूणकर
(4) दाजीशास्त्री चिपळूणकर

14. 'कृत्रीम' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द खालील पर्यायामधून शोधा ?

(1) नकली
(2) नैसर्गिक
(3) बनावट
(4) कोरीव

15. 'भारुड' हा काव्यप्रकार कोणामुळे प्रसिद्ध झाला ?

(1) एकनाथ
(2) नवनाथ
(3) रंगनाथ
(4) शांतीनाथ

SEAL

16. लेखननियमांनुसार खालीलपैकी **अचूक** शब्द कोणता ?

(1) बहिष्कृत
(2) बहिष्क्रत
(3) बहिषकृत
(4) बहिषक्रुत

17. 'हायकू' हा काव्यप्रकार कोणत्या देशातील आहे ?

(1) भारत
(2) जपान
(3) चीन
(4) पाकिस्तान

18. खालील वाक्य कोणत्या प्रकारचे आहे ?

**वाक्य** – जगी सर्वसुखी असा कोण आहे.

(1) प्रश्नार्थी
(2) अज्ञार्थी
(3) विधानार्थी
(4) नकारार्थी

19. 'पंचवटी' या सामासिक शब्दातील समास कोणता ?

(1) कर्मधारय (2) द्विगू

(3) द्वंद्व (4) अव्ययीभाव

20. चित्रपटसृष्टीत भरीव काम करणाऱ्याला 'दादासाहेब फाळके' पुरस्कार कोणत्या सालापासून दि

जातो ?

(1) 1879 (2) 1979

(3) 1969 (4) 1869

21. खालीलपैकी कोणाला 'ज्ञानपीठ पुरस्कार' मिळाला **नाही** ?

(1) वि.स. खांडेकर (2) बा.भ. बोरकर

(3) वि.वा. शिरवाडकर (4) विंदा करंदीकर

**22.** मराठी भाषेतील पहिला चरित्रग्रंथ कोणता ?

(1) गोविंदप्रभूचरित्र

(2) श्रीकृष्णचरित्र

(3) लीळाचरीत्र

(4) दत्तात्रयप्रभूचरित्र

**23.** खालील चरणात कोणता अलंकार आहे ?

— डोकी अलगद घरे उचलती ।

काळोखाच्या उशीवरूनी ॥

(1) अनन्वय

(2) व्यतिरेक

(3) दृष्टांत

(4) चेतनगुणोक्ती

**24.** 'सासवड' येथे भरलेले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन कितवे होते ?

(1) 77वे

(2) 67वे

(3) 87वे

(4) 88वे

25. खालील म्हण पूर्ण करण्यासाठी दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडा :

– बैल गेला अन् ................

(1) गोठा केला
(2) वटा केला
(3) खोपा केला
(4) झोपा केला

26. शुद्ध जिज्ञासा आणि शास्त्रीय दृष्टीकोन हेच सत्यापर्यंत पोहचण्याचे मार्ग आहेत, या वाक्यातील 'आणि' हा शब्द कोणता अव्यय आहे ?

(1) केवळप्रयोगी
(2) उभयान्वयी
(3) शब्दयोगी
(4) क्रियाविशेषण

27. लेखननियमांनुसार पुढीलपैकी कोणते वाक्य अचूक **नाही** ?

(1) पावसाळ्यात वारूळ वाहून जाते.

(2) मी परवा एक मूक्त तुरुंग पाहीला.

(3) इथ वेदनांची सहवेदना झाली.

(4) अम्मां रात्रभर तो स्वयंपाक करायची.

**28.** 'सिंधुताई सपकाळ' यांच्या आत्मचरित्राचे नाव काय ?

(1) आयदान (2) मी वनवासी

(3) मी एक आई (4) मी सिंधुताई सपकाळ बोलतेय

**29.** खाली दिलेल्या वाक्यातील अधोरेखित वाक्प्रचारासाठी दिलेल्या पर्यायांपैकी कोणता पर्याय योग्य आहे ?

– पुढे नापास होणार ह्याची त्यांना <u>तमा नसेल</u>.

(1) भीती नसेल (2) काळजी नसेल

(3) पर्वा नसेल (4) इच्छा नसेल

**30.** पुढील वाक्य कोणत्या बोलीभाषेतील आहे ?

– मंडपमां गाद्या टाकेल व्हत्यात.

(1) वारळी (2) अहिराणी

(3) चंदगडी (4) मालवणी

**प्रश्न 31-40 : खाली दिलेल्या गद्य उताऱ्यातील रिकाम्या जागी दिलेल्या पर्यायातून योग्य पर्यायाची निवड करा.**

एक मनुष्य अखंड (31) .................................. आणि दुसरा सतत उपाशी राहतो हे निसर्गाला कधीच मंजूर नाही. एक मनुष्य दुसऱ्याचा (32) .................................. होऊ शकतो हे निसर्गाला कधीच मंजूर नाही. प्रत्येक जण (33) .................................. आहे. त्याचं अस्तित्व कुणाच्या (34) .................................. उभं नाही. एखाद उंच वडाचं झाड केवळ आकारान, सामर्थ्यान मोठं आहे म्हणून त्याचं (35) .................................. जुईच्या फुलापेक्षा जास्त नाही. निसर्गाला (36) .................................. मंजूर नाहीत. मी तुझ्यापेक्षा (37) .................................. आहे अस सांगण्याच्या अहमहमिकेत माणसानीच (38) .................................. निर्माण केले, पंथ निर्माण केले. मानवी (39) .................................. कल्पनेन निसर्ग बंदिस्त नाही. माणसांनी या पृथ्वीवर कस जगाव हे शेवटी (40) .................................. ठरवायच् आहे.

**31.** (1) झोपतो (2) बडबडतो

(3) जेवतो (4) लोळतो

32. (1) सेवक (2) मालक

(3) पालक (4) बालक

33. (1) स्वयंभू (2) स्वतंत्र

(3) समर्थ (4) स्वावलंबी

34. (1) मायेवर (2) दयेवर

(3) छायेवर (4) श्रीमंतीवर

35. (1) मोल (2) मूळ

(3) खोड (4) फळ

36. (1) माती (2) नाती

(3) पाती (4) जाती

**37.** (1) श्रेष्ठ (2) वरीष्ठ

(3) पवित्र (4) स्वतंत्र

**38.** (1) जात (2) पात

(3) रीत (4) धर्म

**39.** (1) शक्तीच्या (2) सामर्थ्याच्या

(3) पावित्र्याच्या (4) मनाच्या

**40.** (1) देवानीच (2) मुलानीच

(3) मुलीनीच (4) माणसानीच

**41.** 'वाटा पळवाटा' या नाटकाचे लेखक कोण आहेत ?

(1) पु.ल. देशपांडे (2) दत्ता भगत

(3) जयवंत दळवी (4) विजय तेंडूलकर

**42.** 1974 मध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन कोठे भरविण्यात आले ?

(1) इचलकरंजी (2) धुळे

(3) घुमान (4) रत्नागिरी

**43.** 'Drama' या पारिभाषिक शब्दाचा मराठी अर्थ कोणता ?

(1) नाटक (2) स्वप्न

(3) नाटकी (4) गायक

**44.** 'गार्यींच्या' समूहासाठी कोणता शब्द **अचूक** आहे ?

(1) घोळका (2) जमाव

(3) कळप (4) तांडा

45. गद्य पाठाच्या आधारे वाक्य पूर्ण करा :

बा तृणा ! तू तपोधनाची ..............................

(1) तपोभूमी आहेस (2) जन्मभूमी आहेस

(3) कर्मभूमी आहेस (4) यज्ञभूमी आहेस

46. खालीलपैकी कोणास विनोदी लेखक म्हणून ओळखले जाते ?

(1) साने गुरूजी (2) श्री.म. माटे

(3) पु.ल. देशपांडे (4) कृष्णा खोत

47. 'गीतरामायण' या अजरामर काव्याचे रचनाकार कोण आहेत ?

(1) आनंद माडगूळकर (2) व्यंकटेश माडगूळकर

(3) ग.दि. माडगूळकर (4) चिं.त्र्यं. खानोलकर

48. 'पुढच्या जन्मात हरीण होईन असा आशीर्वाद द्या' – हे वाक्य कोणी उद्गारले आहे ?

(1) कसाई

(2) गोधराज

(3) महाराज

(4) पिलू

49. 'अमृतवेल' ही कादंबरी कोणी लिहिली आहे ?

(1) संत ज्ञानेश्वर महाराज

(2) वि.स. खांडेकर

(3) ह.न. आपटे

(4) आनंद यादव

50. 'छात्रालयात' या शब्दाची विभक्ती ओळखा :

(1) पंच

(2) सप्तमी

(3) द्विती

(4) चतुर्थी

कच्च्या कामासाठी फक्त

SEAL